CMYK

बीड । सोमवार
२४.०३.२०२५
वर्षे : ४ अंक : ३४५
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# “एक खोक्याभाई काय घेऊन बसलात ? अख्खी विधानसभा...”, राज ठाकरेंचं विधान चर्चेत

**मुंबई । प्रतिनिधी**

आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी आतापासून जोरदार तयारीला सुरुवात केली आहे. या आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय नेते आपआपल्या पक्षसंघटनेचा आढावा घेत आहेत. या माध्यम ातून कार्यकर्त्यांना कामाला लागण्याच्या सूचना दिल्या आहेत. या पार्श्वभूमीवर आज मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी देखील मुंबईत पक्षसंघटनेच्या पदाधिकाऱ्यांची महत्वाची बैठक घेतली. या बैठकीत राज ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केलं.

यावेळी राज ठाकरे यांनी पक्षाला बळकटी देण्याच्या पार्श्वभूमीवर पक्षाच्या संघटनेत काही महत्वाचे बदल देखील केले. मनसेच्या केंद्रीय समितीची स्थापना करत मुंबई आणि ठाणे शहरातील पदाधिकाऱ्यांवर नवी जबाबदारी सोपवण्यात आली आहे. दरम्यान, राज ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना एक सूचक विधान केलं. एक खोक्याभाई काय घेऊन बसलात? अख्खी विधानसभा भरलेली आहे, असं म्हणत राज ठाकरे यांनी राज्य सरकारवर अप्रत्यक्ष टीका केली आहे.



राज ठाकरे नेमकं काय म्हणाले?

मला हे कळलं नाही, एक खोक्याभाई काय घेऊन बसलात? अख्खी विधानसभा भरलीय. आतमध्ये विधानसभेत सगळे खोकेभाईच भरलेत. मूळ विषय बाजूला राहतात आणि आणि बाकीच्या सगळ्या गोष्टीत तुम्हाला भरकटवून टाकलं जात आहे, असं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, भाजपाचे आमदार सुरेश धस यांचा कार्यकर्ता सतीश उर्फ खोक्या भोसलेची काही दिवसांपासून मोठी चर्चा सरु आहे. त्याचे पैसे उडवतानाचे काही व्हिडीओ व्हायरल झाले होते. दरम्यान, याचाच संदर्भ देत राज ठाकरे यांनी आज मनसेच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत महायुती सरकारवर अप्रत्यक्ष टीका केली आहे. राज ठाकरे यांनी केलेल्या या टीकेला आता भाजपाचे मुंबईचे अध्यक्ष आशिष शेलार यांनी प्रत्युत्तर दिलं आहे.

आशिष शेलार यांनी काय प्रत्युत्तर दिलं?

मला वाटतं की एखादं वाक्य आपलं आस्तित्व जाणून घेण्यासाठी केलं जातं आणि मग आपल्याकडे सर्वांचं लक्ष आकर्षित करून घेतलं जातं. हे महाराष्ट्रातील जनतेला कळलेलं आहे. महाराष्ट्राच्या विधानसभेच्या निवडणुकीत जे कामे करतात, मग ते कोणत्याही पक्षाचे असतील त्यांना जनतेने निवडून दिलेलं आहे. मात्र, ज्यांना निवडून येता येत नाही. ज्यांना लोक निवडून देत नाहीत ते विधानसभेत न जाता अशा प्रकारे ‘विधानं’ करण्याच्या कार्यक्रमात बसतात, अशा शब्दांत आशिष शेलार यांनी राज ठाकरे यांना प्रत्युत्तर दिलं आहे.

## आ. विजयसिंह पंडित यांच्या हस्ते निपाणी जवळचा येथे विकासकामांचा शूभारंभ

### पाच वर्षात गेवराई विधानसभा मतदारसंघाचा चेहरामोहरा बदलणार

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई विधानसभा म तदारसंघाचे लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित यांनी विकास कामांचा धडाका सुरू केला असून आज निपाणी जवळका येथे ग्राम पंचायत भवन सभामंडप व

▶▶ उर्वरित पान २ वर



## ऐतिहासिक संदर्भ, पुरावे नसलेल्या वाघ्या कुत्र्याची समाधी रायगडवरुन ३१ मे पर्यंत हटवा

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

कोणताही ऐतिहासिक संदर्भ नसलेल्या, पुरावे नसलेल्या वाघ्या कुत्र्याची समाधी रायगड किल्ल्यावरून हटवण्यात यावी अशी मागणी माजी खासदार आणि रायगड विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष संभाजीराजे छत्रपती यांनी केली आहे. तशा आशयाचे पत्र त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिलं आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीलगत एका कपोलकल्पित कुत्र्याची समाधी व पुतळा उभारणे हे महाराष्ट्राचे दुर्दैव असल्याचं ते म्हणाले. ३१ मे पर्यंत हा पुतळा हटवण्यात यावा असंही त्यांनी आपल्या पत्रात म्हटलं आहे.





रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीच्या मागे कथित वाघ्या कुत्र्याची सम ाधी बांधण्यात आली आहे. या गोष्टीला कोणताही ऐतिहासिक आधार नसल्याचं सांगत शिवभक्तांनी त्याला अनेकदा

▶▶ उर्वरित पान २ वर

## तुळजापुरात खोक्यासाठी आदिवासी समाज रस्त्यावर

### सतीश भोसले खोक्या नव्हे तर आमचा विठ्ठल, मित्राच्या हातावर टॅटू;



**तुळजापुर । प्रतिनिधी**

भाजपचा पदाधिकारी आणि आमदार सुरेश धस यांचा कार्यकर्ता अशी ओळख असलेला सतीश भोसले उर्फ खोक्या भाईची दहशत सोशल मीडिया वरून व्हायरल झाल्यानंतर आधी वनविभागाची कारवाई आणि नंतर १४ दिवस न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली. याचवेळी धाराशिवात मात्र,सतीश भोसले खोक्या नाही तर आमचा विठ्ठल असे म्हणत मित्रांच्या हातावर विठ्ठल नावाचे टॅटू काढलंय. सतीश भोसलेची चुकीची प्रतिमा तयार केल्याचा आरोप करत त्याच्या कुटुंबीयांच्या समर्थनार्थ आदिवासी समाज आक्रमक झाला आहे .वनविभागाकडून केलेल्या कारवाईच्या निषेधार्थ तुळजापुरात आदिवासी समाजाने रास्ता रोको केलाय. या रास्ता रोको ला दलित पँथरचा ही सक्रिय पाठिंबा आहे.

वनविभागाच्या अधिकार्यांवर कारवाई करावी,सतीश भोसलेचा जातीवाचक उल्लेख करणार्यांवर अॅट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करावा तसेच सतीश भोसले यांच्या कुटुंबीयांवर दाखल करण्यात आलेले खोटे गुन्हे मागे घ्यावेत अशी मागणी या आंदोलकांनी केली आहे.राजकीय उट्टे काढण्यासाठी सतीश भोसलेला टार्गेट केल्याचा आरोपही आदिवासी समाजातून करण्यात आलाय.

## मराठवाड्यातल्या ७५ मध्यम प्रकल्पात १ टक्के पाण्याचा साठा ;गोदावरी नदीवरील बंधाऱ्यात ३६ टक्के पाणी

**बीड । प्रतिनिधी**

यावर्षी उन्हाची तिव्रता अधिक जाणवू लागली. पाण्याचे झपाट्याने बाष्पीभवन होऊ लागले. अख्खा उन्हाळा आणि पाऊस पडेपर्यंत पिण्याच्या पाण्याचे नियोजन प्रशासनाला करावे लागत असते. मराठवाड्यातल्या तलावातील पाण्याचा साठा जेमतेम असला तरी त्यात योग्य ते



नियोजन करणे गरजेचे आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

## ज्ञानराधाच्या दोन अधिकाऱ्यांना न्यायालयाने जामीन नाकारला

**बीड । प्रतिनिधी**

ज्ञानराधा मल्टीस्टेटमध्ये कोट्यावधी रूपयांचा अपहार झालेला आहे. या प्रकरणी मल्टीस्टेटच्या चेअरमनसह अधिकार्यावर व संचालक मंडळावर गुन्हे दाखल झालेले आहेत. शाखा व्यवस्थापक जोगदंड व वित्तीय अधिकारी सुरवसे या दोघांनी जामीनीसाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात अर्ज दाखल केला होता. त्यांचा अर्ज खंडपीठाने फेटाळून लावला आहे.

ज्ञानराधा मल्टीस्टेटमध्ये कोट्यावधींचा अपहार झाला. या प्रकरणात तत्कालीन सहाय्यक वित्तीय अधिकारी संतोष सुरवसे आणि शाखा व्यवस्थापक संतोष जोगदंड ▶▶ उर्वरित पान २ वर







दैनिक
मराठवाडा पत्र
वर्धापन दिन

वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...

चतुर्थ वर्धापन दिन

सर्वांना नमस्कार, ! तुमच्या प्रतिक्रिया आमच्यासाठी महत्त्वाच्या आहेत.

आपले दैनिक मराठवाडा पत्र येत्या ३० मार्च २०२५ ला चार वर्ष पूर्ण करत असून पाचव्या वर्षांमध्ये पदार्पण करत आहे . गेल्या चार वर्षांत आपण सर्वांनी आम्हाला भरभरून प्रेम दिले. दैनिक मराठवाडा पत्रच्या चौथ्या वर्धापनदिनानिमित्त दिनांक ३० मार्च २०२५ ला आम्ही विशेषांक प्रकाशित करत आहोत. या विशेष अंकामध्ये तुमच्या प्रतिक्रिया आमच्या पुढील कार्यासाठी महत्त्वाच्या ठरतील.

आपणं आपल्या प्रतिक्रिया दिनांक २५ मार्च २०२५ पर्यंत खालील ई-मेल व मोबाईल नंबरवर पाठवाव्यात. दैनिकाबद्दल आपली प्रतिक्रिया व फोटो पाठवावा हि विनंती.

मो.क्र. ९८२२१५२९५५, Email-dailymarathwadapatra2021gmail.com
वरील नंबर व ई-मेलवर प्रतिक्रिया पाठवाव्यात.

CMYK

# पाणी बचतीची सवय लावूया !

यापूर्वी कधीही न अनुभवलेला उकाडा यंदा राज्यातील नागरिकांना मार्च महिन्यातच सहन करावा लागत आहे. एप्रिल आणि मे महिन्यात उन्हाची तीव्रता आणखी वाढणार असल्याने उष्माघाताची शक्यता वर्तवली जात आहे. अन्य ऋतूंच्या तुलनेत उन्हाळ्यात पाण्याचा वापर अधिक वाढतो. वाढती लोकसंख्या, शहरांत सुरु असलेली विकासकामे यांमुळे उपलब्ध पाणी साठ्यावर प्रचंड ताण येत असतो. त्यामुळे येणाऱ्या काळात शहरांतील नागरिकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागणार आहे हे निश्चित आहे. उन्हाळा सुरु झाला की राज्य तसेच जिल्हा प्रशासनाकडून दरवर्षी पाणी वाचवण्याचे आवाहन करण्यात येते. आगामी काळात जगायचे असेल, तर आज पाण्याची बचत करणे अनिवार्य झाले आहे. बऱ्याचदा शेजारी पाजारी अन्य कोणी पाण्याची बचत करताना दिसत नाहीत, मग मीच का पाणी वाचवावे, असे विचार मनात येतात: मात्र शेजारची व्यक्ती पैशाची उधलपट्टी करते म्हणून त्याचे पाहून आपण ती करत नाही, कारण पैशाचे महत्व, पैसे वाचवण्याचे महत्व, पैसे कमावण्यासाठी लागणारी मेहेनत याबाबतची जाण आपल्या प्रत्येकाला आहे. आज पाणी सहज उपलब्ध होत आहे याचा अर्थ भविष्यातही ते सहज उपलब्ध होईलच असे नाही. त्यामुळे पाण्याच्या बचतीचे महत्वही आपण लक्षात घ्यायला हवे. आपल्या लहान सहान कृतीतून पाण्याची बचत आपल्याला करता येते. पाणी वाचवणे म्हणजे अस्वछ राहणे असे मुळीच नव्हे,आपल्या दैनंदिन स्वच्छतेसाठी उदा. आंघोळ, तोंड धुणे, हात धुणे आणि अन्य स्वच्छतेसाठी किती पाणी आपण व्यय करतो हें प्रत्येकाला ज्ञात असते. त्यामध्येही



उन्हाळ्यात जर आपण शॉवरचा वापर करत असू तर बादलीचा वापर करून कित्येक लिटर पाणी आपण वाचवू शकतो, हात धुताना हाताला हँडवॉश अथवा साबण लावेपर्यंत आपण नळ चालूच ठेवत असू तर तो बंद करायला हवा. कपडे आणि भांडी धुतांनाही हाच नियम पाळूया. भांड्यांना साबण लावताना नळ बंद ठेवूया. पिण्यासाठी आवश्यक तेव्हढेच पाणी घेऊया, जेणेकरून पाणी पिऊन झाल्यानंतर पेल्यात उरलेले पाणी अन्यत्र टाकावे लागणार नाही. कपडे धुण्यासाठी आणि भांडी घासण्यासाठी शक्य असल्यास काही दिवस यंत्राचा वापर न करता हाताने धुण्याचा प्रयत्न करूया. घरातील एखादा नळ बिघाड झाल्याने त्यातून पाणी गळत असेल, तर तो तत्परतेने दुरुस्त करून घेऊया. झाडांना आवश्यक तेव्हढेच पाणी देऊया. एखाद्या ठिकाणी पाईपलाईनमधून पाण्याची गळती होत असेल तर त्वरित पाणी खात्याला कळवून त्या ठिकाणी दुरुस्ती करून घेऊया. पाणी वाचवण्याचे महत्व आपल्या घरातील लहानग्यांनाही सांगुया. आपण जर सोसायटीत राहत असू तर सोसायटीची मिटिंग घेऊन पाणी वाचवण्याचे प्रयत्न सामूहिकपणे करण्याचा प्रयत्न करूया ! पाण्याला जीवन असे म्हटले जाते. फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये महागडे जेवण जेवल्यानंतरही ते पचण्यासाठी जेवणांनंतर किमान ग्लासभर पाणी तरी आपल्याला हवेच असते. पाण्याविना जीवनाची आपण कल्पनाही करू शकत नाही. काही देशांमध्ये पाणीटंचाईमुळे इंधनाच्या दरात पाणी विकले जात असल्याच्या बातम्या आजवर आपण वाचल्या आहेत. आज आपण पाणी नाही वाचवले तर भविष्यात भारतातही अशीच परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यासाठी पाणी वाचवण्याची सवय आतापासून अंगवळणी पाडूया ! कितीही पाऊस पडला तरी ज्या प्रमाणात लोकसंख्या वाढत आहे आणि ज्या प्रमाणात पाण्याचा व्यय होत आहे ते पाहता उपलब्ध जलसाठे दरवर्षी अपुरेच पडतात. गेल्या काही वर्षांचा अंदाज घेता हवामान खाते आणि पाऊस यांचे गणित कधी जुळताना दिसत नाही त्यामुळे यंदाही पुरेसा पाऊस पडेल याची काहीच शाश्वती नाही. राजकीय मंडळींकडून महाराष्ट्र राज्य समृद्ध पथावर असल्याचे कितीही सांगण्यात येत असले, तरी राज्याच्या काही भागांतील नागरिकांना दरवर्षी भीषण पाणी टंचाईला तोंड द्यावे लागते. ५-६ किलोमीटर अंतर पायपीट करून पाणी आणावे लागते. पाण्याच्या एका थेंबासाठी दरवर्षी कितीतरी पशु पक्ष्यांचा बळी जातो. भगवंताच्या कृपेमुळे आपल्याला पुरेसे पाणी मिळते त्याबद्दल आपण कृतदक्य राहूया आणि आतापासूनच पाणी बचतीची सवय स्वतःला आणि आपल्या कुटुंबाला लावून घेऊया जेणेकरून भविष्यात पाणीबाणी निर्माण झालीच तर तिचा सामना आपल्याला समर्थपणे करता येईल !

– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई

पान ४ वरून पुढे...

## 'आ.सुरेश धस...

उंची वाढवणे तसेच अनेक गावातील रस्ते शाळा, बांधकामे, अंगणवाडी, बांधकामे अनेक गावचे पाणीपुरवठा योजना ही कामे आमदार सुरेश धस यांनीच केलेली आहे. आजवर यापूर्वी कोणत्याही आमदाराने न केलेली कामे ही आमदार सुरेश धस यांनी केलेले आहेत आणि यापुढे येथे करणार आहेत असा आम्हाला विश्वास असून यामुळे आमदार सुरेश धस यांची बदनामी खपवून घेणार नाहीत हे भाऊसाहेब लटपटे यांनी ध्यानात घ्यावे असा इशाराही त्यांनी या निवेदनाद्वारे दिला आहे या समाज बांधवांमध्येआष्टी दूध संघाचे चेअरमन आजिनाथ सानप, दूध संघ माजी चेअरमन दूध एन टी गर्जे, माजी चेअरमन आत्माराम फुंदे, जि. प.सदस्य रावसाहेब शिरसाठ, माजी संचालक भगवान सांगळे, माजी सरपंच उद्धव गर्जे,दिलीप गर्जे, सुंदरलाल गर्जे,आश्रुबा गोल्हार, विठ्ठल गर्जे, बाळासाहेब वणवे, नारायण वनवे,बबन शेकडे,माजी सरपंच काका गर्जे,शेषराव गर्जेफौजी, अक्षय गर्जे, सारूख मामा,एन व्ही नागरगोजे,माणिक दहिफळे, वसंत मिसाळ,मोहन आघाव, इंद्रजीत गर्जे, बबन शेकडे, अशोक मिसाळ, बाळासाहेब बाबूलाल सांगळे, आदीसह आष्टी तालुक्यातील वंजारी समाज बांधवांचा मोठया प्रमाणात समावेश होता.

## नेकनुरच्या स्त्री...

आहार औषधे रक्तपुरवठा आदींचा समावेश आहे तर शिशुसाठी तपासणी रक्तपुरवठा औषधे आधी सुविधा मोफत दिल्या जात आहेत आहारामध्ये दोन वेळ जेवण एक वेळ नाष्टा आणि स्नॅकचा यामध्ये समावेश आहे मात्र नेकनुरच्या स्त्री रुग्णालयात अधिकाऱ्यांच्या उदासीनतेमुळे या योजनेचा लाभ मातांना मिळत नसल्याचे चित्र आहे त्यामुळे शहरातील तसेच इतर गावातील रुग्णांना व मातांना वंचित राहावे लागत असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

आहाराचा पुरवठा करण्यासाठी शासनाने प्रक्रिया निविदा राबवून खाजगी कंत्राटदार नियुक्त केले आहेत परंतु कंत्राटदार व रुग्णालयाचे अधीक्षक सकस आहार खात असल्याने रुग्णांना आहार मिळत

पान ४ वरून पुढे...

नसल्यामुळे नातेवाईकांना इतर पर्यायांचा शोध घ्यावा लागत आहे बाहेर गावच्या रुग्णांना अधिकचे पैसे खर्च करून जेवणाची सोय करावी लागत आहे. तसेच गर्भवती महिलांना योग्य संतुलित आहार आणि सकस आहार न मिळाल्याने पर्यायाने त्यांना होणाऱ्या बाळाला धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही तरी या संपूर्ण प्रकरणाचे तात्काळ दखल घेऊन जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर अशोक थोरात योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी मागणी नेकनूर येथील ग्रामपंचायतने उघड केल्याने सोशल मीडियावर स्त्री रुग्णालयाबाबत पोस्टचा नेकनूर मध्ये महापूर आल्याचे पहावयास मिळत आहे.

## कै. अण्णासाहेब पाटील...

अँड मॅनेजमेंट सायन्स बीड महाविद्यालयामध्ये शहीद दिन आणि कै. अण्णासाहेब पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी रमेश पोकळे बोलत होते. यावेळी कार्यक्रमाला श्री.बन्सी हावळे सर तावरे साहेब, संतोष फावडे सर,सचिव प्रा. गणेश पोकळे, प्राचार्य बप्पासाहेब हावळे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना रमेश पोकळे म्हणाले की, भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक महापुरुषांनी आपले बलिदान दिले आहे. भारतीय स्वतंत्र लढ्यामध्ये शहीद भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांचे योगदान मोलाचे आहे. त्यांनी देशासाठी दिलेले बलिदान आजच्या युवकांना नवी दिशा देणारे आहे. तसेच कै. अण्णासाहेब पाटील यांनी आपले संपूर्ण जीवन सर्वसामान्य नागरिकांच्या कल्याणासाठी समर्पित केले. मराठा समाजाला आरक्षण मिळावे, खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षणामध्ये सवलती मिळाव्यात, शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य भाव मिळावा. यासाठी स्वतः आमदार असताना मुंबई येथे भव्य मोर्चा काढून सरकारकडे विविध मागण्या मांडल्या.परंतु तत्कालीन सरकार आपल्या मागण्या मान्य करत नसल्यामुळे त्यांनी समाजासाठी बलिदान दिले. त्यांनी समाजासाठी दिलेले बलिदान सदैव स्मरणात राहील असे पोकळे म्हणाले. या कार्यक्रमाला प्रा. रफिक सय्यद, श्री आगलावे, महेश नेवडे, दीपक जाधव, सचिन चौरे आदी उपस्थित होते.

पान ४ वरून पुढे...

## डॉ. देवरे यांनी...

हास्य आणि माया यांनी भारलेला तो दिवस आयुष्यभर लक्षात राहणारा ठरला.

मागच्या वर्षी डॉ. पृथ्वीराज आणि डॉ. जागृती यांच्या विवाहात सुरू झालेली ही सुंदर परंपरा याही वेळी पाहायला मिळाली. बीडच्या बदनामीच्या बातम्या देणाऱ्यांनी अशा गोष्टींकडेही पाहायला हवं. डॉ. देवरे यांनी बीडमध्ये येऊन आनंदग्रामच्या मुलांना कुटुंबासारखं स्वीकारलं – हेच या विवाहाचं खऱ्या अर्थाने सौंदर्य आहे.

## २३ मार्च चा...

व्यक्तीकडून कर्जाने घेऊन आम्ही ते पाच लाख रुपये शिवाजी कवठेकर यांच्या नावाने तीन लाख, तर विनोद इंगोले यांच्या नावाने दोन लाख रुपये डिसेंबर २०२२ मध्ये न्यायालयात जमा केले.त्यानंतर याचिकेच्या १२ जानेवारी २०२३, १६ मार्च, २७ एप्रिल, २६ जून,२७ ऑगस्ट, सप्टेंबर, ८ नोव्हेंबर अशा सात तारखा झाल्यानंतर डिसेंबर २०२३ मध्ये याचिका सुनावणीला घेऊन,मा न्यायालयाने सरकारला याचिकेत करण्यात आलेल्या २३ मार्च १९९४ च्या जीआर रद्द करण्याच्या मागणीवर उत्तर देण्यास फर्मावले. त्यावर डिसेंबर २०२३ मध्ये सरकारचे महाधिवक्ता वीरेंद्रकुमार श्रॉफ यांनी स्वतः न्यायालयात उपस्थित राहून सरकारचे उत्तर दाखल केले.सरकारने दिलेल्या त्या उत्तरावर आपले प्रत्युत्तरही( रिजॉइंडर) आपण लेखी स्वरूपात जानेवारी २०२४ मध्ये लेखी स्वरुपात दाखल केले.परंतु मार्च २४ मध्ये राज्य सरकारने मराठा समाजाला ५० टक्क्यांच्या वर दिलेल्या दहा टक्के आरक्षणावर आक्षेप घेणारी याचिका त्रिसदस्यीय विशेष घटनापीठ स्थापून न्यायालयाने नियमितपणे सुनावणीला घेतल्यामुळे, आपल्या याचिकेवर गेल्या संपूर्ण वर्षभरात सुनावणी काही होऊ शकली नाही.त्यानंतर या चालू वर्षात १५ जानेवारी व १७ फेब्रुवारी अशा दोन तारखा पडल्या होत्या.परंतु मा मुख्य न्यायाधीश यांची त्यादरम्यानच बदली झाल्यामुळे या दोन्हीही तारखा होऊ शकल्या नाहीत.तथापि, यापुढे मिळणाऱ्या तारखांमध्ये आपल्या याचिकेवर सुनावणी होईल व सुनावणीनंतर आरक्षणाबाहेरील

पान ४ वरून पुढे...

मराठा,ब्राह्मण,जैन,लिंगायत,मारवाडी,अल्पसंख्यांक या राज्यातील साडेआठ कोटी लोकांमधील गरीब लोकांवर गेल्या ३१ वर्षांपासून अन्याय करत आलेला २३ मार्च १९९४ चा तो घटनाबाह्य पद्धतीने काढण्यात आलेला

जीआर न्यायालय नक्कीच रद्द करील अशी आशा आहे.तथापि,या न्यायालयीन लढाईसाठी लोकांनी दिलेल्या पैशांपेक्षा झालेला व होणारा खर्च खूप जास्त असल्यामुळे, शिवाजी नारायणराव कवठेकर, भारतीय स्टेट बँक बचत खाते क्र.३०८९७७१९४४१,आय एफ सी कोड एस बी आय एन ०००३६६८ या खात्यावर किंवा ९०४९० १३७५१ या मोबाईल क्रमांकावर लोकांनी आपली आर्थिक मदत पाठवावी असे आवाहन आरक्षण बचाव आंदोलन समितीच्या वतीने प्रसिद्ध केलेल्या पत्रकातून सर्व याचिकाकर्त्यांनी केलेले आहे.

## पवनचक्की कंपन्यांनी...

जिल्हा प्रशासनाची भुमिका म्हणजे कुंपनच शेत खातंय ; पवनचक्की कंपन्यांची पाठराखण तर पिडीत शेतकऱ्यांना वालीच नाही :डॉ.गणेश ढवळे

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग ऊर्जा आणि कामगार विभागाने दि.२१ आक्टोबर २०२३ रोजी पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय संनियंत्रण समित्यांची स्थापना केली असुन पवन ऊर्जा प्रकल्पाशी निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहाराबाबत कायदेशीर बाबी व अनिश्चितता तपासणे, जमिनीच्या व्यवहारांमध्ये योग्य व्यावहारिक मोबदला मिळत असल्याबाबत खात्री करणे.पवन ऊर्जा प्रकल्पाबाबत समितीकडे आलेल्या तक्रारींची चौकशी करून त्यावर योग्य कारवाई करणे.शेतकरी आणि ग्रामस्थ आणि प्रकल्प विकासक यांच्यामध्ये समन्वय ठेवणे आदि त्यांची कामे असुन जिल्हाधिकारी समितीचे अध्यक्ष तर पोलिस अधीक्षक सदस्य आहेत.मात्र या समित्या केवळ कागदावर कार्यरत असुन जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षक केवळ पवनचक्की कंपन्यांचीच पाठराखण करत असुन पिडीत शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले असुन जिल्हा प्रशासनाची भूमिका कुंपनच शेत खातंय अशी झाल्याची संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी व्यक्त केली आहे.

पान १ वरून पुढे...

## आ. विजयसिंह पंडित...

पंधराव्या वित्त अयोगातुन पाण्याची टाकी उभारणी या विविध विकास कामांचा शुभारंभ त्यांच्या हस्ते करण्यात आला. आपण मला विधानसभेत काम करण्याची संधी दिली असून त्या बळावरचयेणाऱ्या पाच वर्षांत गेवराई विधानसभा मतदारसंघाचा चेहरामोहरा बदलणार असल्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. गेवराई विधानसभा मतदारसंघातील निपाणी जवळका येथे आ. विजयसिंह पंडित यांच्या हस्ते विवीध विकासकामांचा शुभारंभ करण्यात आला. यामध्ये ग्रामपंचायत भवन सभामंडप व पंधराव्या वित्त अयोगातुन पाण्याची टाकी या कामाचा शुभारंभ यावेळी करण्यात आला. याप्रसंगी पंचमुखेश्वर संस्थान भाटेपुरीचे महंत महादेव महाराज श्रावणपुरी, जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण संचालक जगन्नाथ शिंदे, श्रीराम आरगडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, निपाणी जवळक्याचे ग्राम दैवत श्री ज्योतीबारायांच्या यात्रे साठी या गावामध्ये मी गेले कित्येक वर्षापासून येत आहे. यात्रे मध्ये बारा गाड्या ओढण्याचा मान मला दिला जातो हे मी कदापीही विसरणार नाही. येणा-या काळामध्ये निपाणी जवळका येथील मारुती मंदिर सभामंडप, श्री ज्योतीबारायांच्या मंदिराकडे जाणारा रस्ता, दलीत समाजासाठी स्मशानभूमी व औरंगपुर तांड्यावरील स्मशानभूमीचे बांधकाम केले जाईल. निपाणी जवळका ह्या गावाचे शिवछत्र परीवारा समवेत कायम जिव्हाळ्याचे संबंध आहेत. विकासकामे दर्जेदार करण्यासाठी ग्रामस्थांनी सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यावेळी ग्रामस्थांच्या वतीने आ. विजयसिंह पंडित यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बाबुराव सावंत, बळीभाऊ चव्हाण नवनाथ

पान १ वरून पुढे...

वेताळ, सरपंच विष्णुपंत घोंगडे, अशोक नाईकवाडे, अंकूश गायकवाड रामदास मुंढे, मंगेश कांबळे, महादेव जाधव, विलास माने, बाबुराव काकडे, राम लोणकर, कचरू काकडे, शिवाजी आतकरे, ज्ञानेश्वर काकडे, आसाराम काकडे, कल्याण ढेरे, दिलीप कुलकर्णी सखाराम लोणकर, अजय लोणकर, बाळु ढेरे, सरपंच मोहन काकडे उपसरपंच बाबासाहेब राठोड यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ऐतिहासिक संदर्भ...

विरोध केला आहे. या आधी एकदा शिवप्रेमींनी तो पुतळा हटवला होता. पण प्रशासनाने तो पुन्हा त्या ठिकाणी बसवला. त्या पुतळ्याला पोलिसांचे संरक्षणदेखील आहे. आता संभाजीराजेंनीही पुन्हा एकदा वाघ्या कुत्र्याचा पुतळा हटवण्याची मागणी केली आहे. वाघ्या कुत्र्याची समाधी ही अलिकडच्या काळात बांधण्यात आली असून ते रायगडवरील अतिक्रमण असल्याचं संभाजीराजेंनी म्हटलं आहे.

काय म्हटलंय संभाजीराजेंनी त्यांच्या पत्रात ?

हिंदवी स्वराज्याची राजधानी दुर्गराज रायगड येथे श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीलगत कथित वाघ्या कुत्र्याची समाधी म्हणून एक संरचना काही दशकांपूर्वी उभारण्यात आलेली आहे. सदर वाघ्या कुत्रा नामक पात्राचा शिवकालीन इतिहासात कोणत्याही प्रकारचा उल्लेख अथवा संदर्भ मिळत नाही.

भारतीय पुरातत्व विभागाने देखील सदर समाधी संरचना व वाघ्या कुत्र्याचे ऐतिहासिक महत्त्व यांबाबत त्यांच्याकडे कोणतीही ऐतिहासिक माहिती व पुरावे उपलब्ध नसल्याची स्पष्टोक्ती दिलेली आहे.

समस्त भारतवासीयांचे श्रद्धास्थान असणाऱ्या श्री छत्रपती शिवाजी

पान १ वरून पुढे...

महाराजांच्या समाधीलगत एका कपोलकल्पित कुत्र्याची समाधी व पुतळा उभारणे हे महाराष्ट्राचे दुर्दैव, श्रद्धेची कुचेष्टा व महान युगप्रवर्तक श्री छत्रपती शिवाजी महाराजांची घोर प्रतारणा आहे.

कोणतीही ऐतिहासिक पार्श्वभूमी व महत्त्व नसलेली सदरील वाघ्या कुत्रा समाधी नामक संरचना हे दुर्गराज रायगडवरील अतिक्रमण असून राज्य शासनाच्या धोरणानुसार दि. ३१ मे २०२५ अखेरीपर्यंत सदरील अतिक्रमण श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीस्थळावरून व दुर्गराज रायगड वरून कायमस्वरूपी हटविण्यात यावे.

भारतीय पुरातत्व विभागाच्या धोरणानुसार १०० वर्षांहून अधिक पुरातन असलेली संरचना संरक्षित स्मारक म्हणून गणली जाते. त्यामुळे वाघ्या कुत्रा समाधी संरचनेस १०० वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच विहित कालमर्यादेत ही संरचना हटविणे अत्यावश्यक आहे.

## मराठवाड्यातल्या ७५....

मध्यम प्रकल्पामधील साठा मात्र कमी झाल्याचे दिसून येत आहे. मराठवाड्यामधील ७५ मध्यम प्रकल्पात फक्त ९.१२ टक्के पाण्याचा साठा शिल्लक राहीला आहे. गोदावरी नदीवर १५ बंधारे असून या बंधार्यात २६ टक्के पाण्याचा साठा राहिलेला आहे. बीड जिल्ह्यातील काही तलावानी तळ गाठला तर काही तलावात पाण्याचा साठा शिल्लक राहीला.

मराठवाड्यातील यावर्षी ९९ टक्के धरणे भरली होती. पाऊस चांगला झाल्याने खरीपासह रब्बी पिके जोमात आली. बहुतांश शेतकर्यांनी उन्हाळी पिकांची लागवड केली आहे. तलावाशेजारी शेतजमिनींना पाटाव्दारे पाणी सोडले जात आहे. मांजरा, माजलगाव, गोदावरी, सिंदफणा यासह इतर बड्या तलावातून शेतीपिकांना पाणी उपलब्ध करून दिले जात आहे. उन्हाची तिव्रता वाढत असल्याने पाण्याचे बाष्पीभवन

पान १ वरून पुढे...

झपाट्याने होऊ लागले. मराठवाड्यातील मोठ्या धरणात ६२ टक्के पाणी शिल्लक आहे. ७५ मध्यम प्रकल्पात ९.१२ टक्के तर ७५१ लघु प्रकल्पात ३१.८० टक्के पाणी साठा शिल्लक राहिला. गोदावरी नदीवरील १५ बंधार्यात २६.२७ टक्के पाण्याचा साठा शिल्लक आहे. मराठवाड्यातील सर्वात मोठे असलेल्या जायकवाडी धरणात ६३ टक्के पाणी आहे. बीड जिल्ह्यातील काही धरणातले पाणी संपले असले तरी इतर धरणामध्ये ४० टक्क्यापर्यंत पाणीसाठा शिल्लक राहीला आहे. माजलगाव, सिंदफणा, मांजरा या बड्या धरणात बर्यापैकी पाणीसाठा शिल्लक आहे. आगामी काळाचा विचार करता प्रशासनाच्यावतीने पाण्याचे नियोजन केले जात असते.

## ज्ञानराधाच्या...

यांच्यावर देखिल गुन्हे दाखल झाले आहे. जामीनीसाठी त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात अर्ज दाखल केला होता. खंडपीठाचे न्यायमुर्ती अभय एस. वाघवसे यांनी यांचा जामीन अर्ज फेटाळला आहे. दोन्ही अर्जदारातर्फे ॲड.आर.जी हंगे आणि ॲड.एस.ई. शेकडे यांनी न्यायालयास विनंती केली की दोघेही सदर सोसायटीचे कर्मचारी असुन त्यांना कुठलाही निधी मंजुर अथवा वितरीत करण्याचा अधिकार नाही. त्यांच्यापेक्षा इतर वरिष्ठ अधिकारी आदेश देतात त्यांचे पालन ते दोघे करतात. फसवणूकीच्या रक्कमेतून त्यांना काहीही लाभ मिळाला नाही. ते जुलै २०२४ पासून तुरूंगात आहे. सदरील गुन्हयाचा तपास पुर्ण झाला असून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल झाले. गुन्ह्यता कुठलाही शोध अथवा कुठलीही वसुली बाकी नाही. संपूर्ण तपास कागदोपत्री आहे. अर्जदाराच्या कोठडीची आवश्यकता नाही म्हणुन दोघांना जामीन मंजुर करण्याची विनंती वकीलांनी केली होती. मात्र त्यांची विनंती न्यायालयाने फेटाळून लावली.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

दैनिक मराठवाडा पत्र | संमिश्र | सोमवार, दि. २४ मार्च २०२५ | पान ३

# गुंतेगाव येथे राष्ट्रीय अन्न सुरक्षा पौष्टिक तृणधान्य अंतर्गत कृषी दिन साजरा

**गेवराई । प्रतिनिधी**

पीक उत्पादनावरील वाढता खर्च कमी करण्यासाठी व किडीची वाढती रोगप्रतिबंधक क्षमता रोखण्यासाठी एकात्मिक पद्धतीनेच किड नियंत्रण होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन कृषी विज्ञान केंद्र खामगाव येथील कीटक शास्त्रज्ञ डॉ.बी.बी गायकवाड यांनी केले.

मंडळ कृषी अधिकारी कार्यालय उमापुर आयोजित गुंतेगाव येथील कृषी दिन कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच विलास वाघमोडे, प्रमुख पाहुणे म्हणून जय भवानी सहकारी साखर कारखाना शिवाजीनगर चे संचालक नंदकिशोर गोरडे, अंबड तालुक्यातील उसाचे एकरी ९० टन उत्पादन घेणारे युवा कृषी पदवीधर शेतकरी सावता काळे, कृषी तंत्रज्ञान प्रसारक बाबू येवले, मंडळ कृषी अधिकारी काकासाहेब पंडित, कृषी पर्यवेक्षक किशोर पठाडे हे उपस्थित होते. प्रभावी किड एकात्मिक नियंत्रणासाठी खोल नांगरट, पक्षी थांबे, पिवळे निळे चिकट सापळे , प्रकाश सापळे, निंबोळी अर्काचा वापर करावा असे श्री गायकवाड यांनी यांनी सांगितले.



कार्यक्रमाचे प्रस्ताविक मंडळ कृषी अधिकारी काकासाहेब पंडित यांनी केले पीक उत्पादनामध्ये जमिनीच्या मगदूराप्रमाणे वाणाची निवड करून पिकाच्या संवेदनशील अवस्थेत संतुलित पाण्याचा व संतुलित खताचा वापर केल्यास अपेक्षित उत्पादन घेता येते असे सांगितले. प्रगतशील युवा शेतकरी श्री काळे यांनी उसाचे एकरी ९० टन उत्पादन तंत्रज्ञान मध्ये बेणे निवड, बेणे प्रक्रिया, संजीवकाचा कार्यक्षम वापर व स्वतः चा अनुभव विशद केला.

बापू येवले यांनी बीज प्रक्रिया विद्राव्य खताचा उत्पादन वाढीम ध्ये सहभाग याविषयी उपयुक्त माहिती सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृषी सहाय्यक मेघराज नाटकर तर आभार प्रदर्शन महावीर मैन्द यांनी केले या कार्यक्रमाप्रसंगी योगेश गोरडे, बंडू गोरडे, बदाम गोरडे ,किरण येवले, अशोक जाधव रवी खोसे पंचक्रोशीतील बहुसंख्य शेतकरी व कृषी सहाय्यक शांतीलाल करंडे, नचिकेत जोशी, योगेश सुरदुसे, संदीप महाडिक,प्रदीप मुने, वैष्णवी आरे उपस्थित होते.

# तलवाडा पोलीस स्टेशनच्या वतीने ईफ्तार पार्टी संपन्न



**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथे पोलीस स्टेशनच्या वतीने पवित्र रमजान असलेला सणाच्या निमित्ताने तलवाडा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मा.सोमनाथजी नरके साहेब यांनी इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी उपविभागीय पोलीस अधिकारी गेवराई मा. नीरज राजगुरू साहेब तलवाडा पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी मा. सोमनाथ जी नरके साहेब तलवाडा पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक मा. कोळी साहेब माजी जिल्हा परिषद सदस्य मा. सुरेश हात्ते साहेब मा श्री जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे डायरेक्टर गणपत नाटकर सर ग्रामपंचायतचे विद्यमान सरपंच विष्णू तात्या हात्ते मा. नजीर भाई कुरेशी पत्रकार अल्ताफ भाई कुरेशी पत्रकार सुरेश गांधले पत्रकार आर आर आबा पत्रकार तुळशीराम वाघमारे उपसरपंच अज्जू भाई सौदागर शेतकरी संघटनेचे नेते खिजर भाई जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक मा.विजय डोंगरे सर पोलीस कर्मचारी मा. काकडे साहेब मा. विठ्ठल चव्हाण साहेब मा.पिसाळ साहेब तलवाडा नगरीतील तमाम हिंदू व मुस्लिम बांधव, गावातील सर्व प्रतिष्ठित व्यक्ती, व्यापारी मित्र, पोलीस मित्र, पोलीस पाटील, पत्रकार बांधव, सरपंच, सदस्य आदींनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविल्याप्रसंगी मा. सोमनाथ नरके साहेब यांनी मानले सर्वांचे आभार.

# कै. अण्णासाहेब पाटील यांची पुण्यतिथी रक्तदान शिबिर आयोजित करून साजरी

**बीड । प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठा महासंघाचे संस्थापक अध्यक्ष क्रांतिसुर्य कै. आमदार, आण्णासाहेब पाटील यांच्या ४३ वी पुण्यतिथी निमित्त प्रतिमेचे पुजन करून व भव्य रक्तदान शिबीर आयोजित करून जिल्हा रुग्णालय बीड येथे रक्तदान युवकांनी रक्तदान केले व जयंती साजरी करण्यात आली. यावेळी अखिल भारतीय मराठा महासंघाचे मराठवाडा सरचिटणीस विनोद आप्पा इंगोले यांच्या अध्यक्षा खाली रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. जिल्हाध्यक्ष बापूसाहेब साळुंके, शहर अध्यक्ष दत्ता शेळके पाटील, जिल्हा उपाध्यक्ष सुरेश गिराम पाटील , तालुका उपाध्यक्ष हिदुळे पाटील , माझ्या पुतण्या भैय्या साळुंके पाटील बोबडे पाटील आदी या प्रसंगी उपस्थित होते.



# लोक अदालती मध्ये १७ कोटीची प्रकरण निकाली

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशावरून व श्री. आनंद एल. यावलकर प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवार दि. २२ मार्च २०२५ रोजी पार पडलेल्या लोक न्यायालयात बीड जिल्हयातुन एकून १७ कोटी रुपयांची ५६०८ प्रकरणे तडजोडीने निकाली निघाली आहेत. बीड जिल्हयातून न्यायालयातील प्रलंबीत प्रकरणांपैकी एकूण ११९२४ प्रकरणे ठेवण्यात आली होती. यामध्ये दिवाणी, फौजदारी, मोटार अपघात, भुसंपादनाची प्रकरणे, १३८ एन.आय.ॲक्टच्या प्रकरणांचा समावेश होता. त्यापैकी ६९३ प्रकरणे निकाली



निघाली आहेत. तर दाखलपुर्व प्रकरणामध्ये एकूण ४४४८४ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी ४९१५ प्रकरणे निकाली निघाली आहेत. असे एकूण ५६०८ प्रकरणे निकाली निघाली आहेत. यामध्ये १७ कोटी ३३ लाख ३३ हजार १५६ एवढ्या रकमेची प्रकरणे निकाली निघाली आहेत. सदरील लोक न्यायालयाच्या प्रसंगी जी. जी. सोनी सदस्य सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्यासह, व्ही .एच.पाटवदकर , जिल्हा न्यायाधीश –२, श्रीमती एस.आर. शिंदे जिल्हा न्यायाधीश ३. श्री. के. आर. जोगळेकर, जिल्हा न्यायाधीश ४ तसेच इतर पॅनल प्रमुख, बीड जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष आर डी .येवले यांच्यासह वकील संघाचे सर्व पदाधिकारी जिल्हा सरकारी वकील व सर्व सरकारी अभियोक्ता यांची लोकन्यायालयात प्रमुख उपस्थिती होती. न्यायालयीन अधिकारी, कर्मचारी, विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी, बँक कर्मचारी, पोलीस कर्मचारी व इतर कार्यालयीन कर्मचारी यांनी लोकअदालत यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# युवा सेनेच्या वतीने मॉक टेस्ट चे आयोजन; विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त सहभाग घ्यावा-युवासेना

**बीड । प्रतिनिधी**



महाराष्ट्रातील युवकांच्या आणी युवतीच्या स्वप्नानां बळ देण्यासाठी युवासेना आणि वाकणकर सिनर्जी अॅक्ेडमी यांच्या संयुक्त विद्यमाने शिवसेना मुख्यनेते श्री एकनाथजी शिंदे साहेब व युवा खासदार डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली, युवासेना कार्याध्यक्ष श्री पुर्वेश सरनाईक यांच्या माध्यमातुन विदयार्थ्यांसाठी ऑनलाईन मॉक टेस्ट २०२५ चे राज्यभरात आयोजन करण्यात आले आहे. या ऑनलाईन मॉक टेस्ट मध्ये बीड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा आणी JEE Mains, MHT CET आणि NEET या महत्वाच्या परीक्षांची तयारी आणखी मजबूत करून आपली स्वप्ने साकार करावीत असे आवाहन युवा सेना कार्यकारिणी सदस्य महाराष्ट्र राज्य तथा संपूर्ण मराठवाडा निरीक्षक विपुल पिंगळे व युवासेना बीड लोकसभा सागर बहीर, युवासेना जिल्हा अध्यक्ष रविराज बडे ,युवासेना जिल्हा अध्यक्ष सुजीत शिंदे यांनी आवाहन केले आहे. Jee mains, MHT CET आणी NEET चे विद्यार्थी तरुण तरुणी ही मॉक टेस्ट घरबसल्या किंवा कुठल्याही ठिकाणावरून ही टेस्ट देऊ शकतात, तसेच कॉम्प्युटर, टॅब, अथवा मोबाईल याच्या माध्यमातून सुद्धा ही मॉक टेस्ट देऊ शकता ती सुद्धा अगदी मोफत, या परीक्षेचे वेळापत्रक : २६ मार्च, बुधवार – गEE MINS (Engineering) तसेच ६ एप्रिल, रविवार – MHT CET (Engineering/ Pharmacy), तथा २० एप्रिल, रविवार रोजी – NEET (Medical) असे वेळापत्रक असणार असून ही ऑनलाईन मॉक टेस्ट संपूर्णपणे युवा सेना आणी सिनर्जी अॅक्ेडमी यांच्या संयुक्त विद्यमाने शिवसेना मुख्यनेते श्री एकनाथजी शिंदे साहेब व युवा खासदार डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली, युवासेना कार्याध्यक्ष श्री पुर्वेश सरनाईक यांच्या माध्यमातुन मोफत असणार आहे आणी मोफत नोंदणीसाठी लिंक: https://shorturl.at/4lQQu वर जाऊन विद्यार्थ्यांने या ऑनलाईन मॉक टेस्ट मध्ये सहभागी व्हायचे आहे अशी माहिती युवा सेना कार्यकारिणी सदस्य महाराष्ट्र राज्य तथा संपूर्ण मराठवाडा निरीक्षक विपुल पिंगळे व युवासेना बीड लोकसभा निरीक्षक सागर बहीर, युवासेना जिल्हा अध्यक्ष रविराज बडे, युवासेना जिल्हा अध्यक्ष सुजित शिंदे यांनी दिली.

# सूर्याच्यावाडी च्या लाल मातीने मर्दागी कुस्तीची परंपरा जोपासली- राजेंद्र मस्के

**बीड । प्रतिनिधी**

सूर्याचीवाडी ता.बीड येथे पिरबाबा दर्ग्याच्या यात्रेच्या निमित्ताने जंगी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सूर्याचीवाडी येथील व परिसरातील हजारो नागरिक उपस्थित होते, या स्पर्धेमध्ये राज्यभरातून कुस्तीतील नामवंत पैलवान यांनी भाग घेतला होता, सूर्याचीवाडी हे गाव लोकसंख्येने कमी असले तरी महाराष्ट्रातील कुस्ती हा पारंपारिक व ग्रामीण खेळ जोपासण्याचे काम सूर्याची वाडी येथील ग्रामस्थांनी केले आहे,अतिशय उत्कृष्ट असे




नियोजन व मोठ्या प्रमाणामध्ये कुस्तीतील भाग घेतलेल्या पैलवानांना बक्षीस देण्यात आले, कुस्ती हा खेळ लाल मातीत खेळला जातो ही लाल मातीतील कुस्तीची दंगल ग्रामीण भागातील नागरिकांना प्रेरणा देणारी असते, हा खेळ मर्दानी खेळ म्हणून या खेळाची ओळख आहे. एकास एक मल्य पैलवान हे आपले ताकदीच्या जीवावर व एकजुटीच्या जीवावर आपलं सर्वस्य पनाला लावून आपण या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाचे बक्षीस कसे पटकवतोल असे प्रयत्न करत असतात ,म्हणूनच लाल मातीतील या कुस्तीला मर्दानी खेळ असे ओळख निर्माण झाली आहे,असे मत राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केले आहे. यावेळी गावातील ज्येष्ठ नागरिक सह पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मी कोणाचाही बांधील नाही मी पैसे खाणार! पीएम घरकुल योजनेतील इंजिनियरची मग्रुरी

## बीडिओ साहेब तुम्ही बाहिरे झाले की तुमचे डोळे दिपले

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यात पंतप्रधान घरकुल आवास योजनेच्या माध्यमातून जनतेची सर्रासपणे लूट चालू आहे आहे पंतप्रधान घरकुल योजनेचा हप्ता काढण्यासाठी इंजिनीयर राजरोसपणे पैसे मागून जनतेचे लोड करत आहे आणि वर सांगतो आहे की मी कॉन्ट्रॅक्ट बेस वरचा इंजिनियर आहे माझे कोणीही काहीच वाकडे करू शकत नाही त्यामुळे मी पैसे खाणारच अशी मगरूर पणाची भाषा वापरत आहे माजलगाव तालुक्यात अशा एक नाही अनेक इंजिनीयर आपल्याला पाहायला मिळतील माजलगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी हे काय बहिरे आहेत का काय यांचे डोळे घेतले आपण एका तालुक्याचे प्रमुख आहोत आणि आपलाच एक माणूस जनतेची सर्रासपणे दूर करतोय हे व्हिडिओ साहेबांना दिसत नाही का त्या इंजिनीयरला तू पैसे घेऊन चिंतेला लुटत रहा मी तुझी पाठ राखण करत राहतो आसाम प्रयत्न तर माजलगावचे गटविकास अधिकारी करत नाहीत ना अशी चर्चा सर्वसामान्य जनतेत चालू आहे त्यामुळेच आम्ही जीवने साहेबाला सांगत असतो तुम्ही तरुण तडफदार आणि इमानदार बीडच्या जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आहात तुम्ही एकटेच इमानदार राहून काही उपयोग होत नाही तुमच्या अक्तरीत येणारे सर्व विभाग सरळ करण्याची गरज आहे मात्र अद्याप पर्यंत तुम्ही जिम्मेदारी झटकत आल्याचा प्रत्यय पाहायला मिळतो आहे त्यामुळे तुमच्या अत्यंत येणाऱ्या सर्व विभागातील अधिकाऱ्यांचे मनोबल वाढत आहे आपला साहेब आपल्या पाठीशी आहे असे समजून खा खा खाऊन प्रत्येक कामात जनतेची सर्रासपणे लूट चालवत आहेत जेवणे साहेब आम्ही तुमच्याकडे घर मागतोय पैसेवाले श्रीमंत नाही आहोत आमच्याकडे पैसे असते तर आम्ही पीएम किसान योजनेचा धिकाकार केला असता आमचं तुम्हाला शेवटचं सांग ना गोरगरिबांच्या पाठीशी उभा रहा आणि बीड जिल्ह्यातील जनतेची होणारी लूट थांबवा रोटी कपडा आणि पण शासनाने दिलेले मकान तरी आमच्यापर्यंत विना मूल्य येऊ द्या माजलगाव तालुक्यात गंगामसला सर्कलमध्ये कॉन्ट्रॅक्ट बेस वर लागलेला कोणीतरी एक इंजिनियर पंतप्रधान घरकुल आवास योजनेसाठी सर्रासपणे जनतेची लूट करत आहे आणि वर तो सांगतो आहे मी काही ठराविक वर्षाच्या कालावधीसाठी खाजगी कंपनीकडून नियुक्त झालेला कर्मचारी आहे जिल्ह्याचा जिल्हाधिकारी असेल किंवा जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी असेल हे माझे काहीच करू शकत नाही आणि पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना मी जुमानत नाही त्यामुळे तुम्हाला पंतप्रधान घरकुल आवास योजनेचे घर हवे असेल तर मला पैसे द्यावेच लागतील त्यामुळे बेबीत झालेले नागरिक दादा कोणाकडे माघावी या द्विधा मनस्थितीत आहेत त्यामुळे जीवने साहेब होऊ द्या तुमच्यातली तरुणाई जागी समज द्या तुमच्या गटविकास अधिकाऱ्याला आणि खड्ड्यात गाडा त्या कॉन्टॅक्ट फेस वरच्या इंजिनियर ला आणि वाचवा सर्वसामान्यांचे आर्थिक लूट आणि व्हा गरिबांचे मशीहा ... नाहीतर जिल्ह्यात जिल्हा प्रशासनाच्या नावावरील जनतेचा विश्वास सोडून जाईल एवढे मात्र नक्की आहे


### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. ए. डी. कुलकर्णी यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २८१ / २०२५**

**मदन विरूध्द निरंक (मार्फत– ॲड. गवारे जी पी गेवराई)**

ज्याअर्थी **मयत वच्छलाबाई भ्र. उत्तमराव घनवट या दिनांक २५/०१/२०२५ रोजी मौजे गुळज, ता. गेवराई जि. बीड** येथे मयत झालेल्या आहेत. **अर्जदार १. मदन पि. उत्तमराव घनवट, वय. ७० वर्षे, धंदा. शेती, रा. गुळज ता. गेवराई जि. बीड** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी रायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता **मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शावीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **मयत वच्छलाबाई भ्र. उत्तमराव घनवट** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल

आज दिनांक २०/०३/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**पुढील तारीख २५/०४/२०२५**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

**शिक्का**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर,गेवराई**

दैनिक ● epaper.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

सोमवार, दि.२४ मार्च २०२५ पान ४



मौजे ईट ता. जि. बीड गुगळादेवी शेतकरी गट यांची राज्यस्तरीय निवड झाल्याबद्दल आणि महाराष्ट्र शासनाचे पाच लाख बक्षीस मिळाल्याबद्दल भाजपाचे पिंपरी चिंचवड सरचिटणीस दीपक जाधव यांनी शुभेच्छा दिल्या व विमल एंटरप्राइजेस यांच्याकडून शेतकरी गटाचा सन्मान करण्यात आला.

# 'आ.सुरेश धस यांचे विरुद्ध गरळ ओकणारे भाऊसाहेब लटपटे यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करा'

## •वंजारी समाज बांधवांचे आष्टी पोलीस स्टेशन येथे निवेदन

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री सुरेश रामचंद्र धस यांची बदनामी करणाऱ्या भाऊसाहेब लटपटे यांचे विरुद्ध कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी आष्टी तालुक्यातील वंजारी समाजातील समाज बांधवांनी आष्टी पोलीस स्टेशन येथे एका निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनामध्ये म्हटले आहे की, आष्टी विधानसभा मतदार संघाचे विधानसभा सदस्य आमदार सुरेश धस यांनी विधानसभा निवडणुकीमध्ये प्रचंड मतांनी विजय मिळवलेला असूनही राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे




कार्यकर्ते भाऊसाहेब लटपटे त्यांची सतत बदनामी करणारे वक्तव्य करत आहेत त्यांच्याविरुद्ध गरळ ओकत आहेत. वास्तविक पाहता भाऊसाहेब लटपटे हेच गुन्हेगारी प्रवृत्तीचे असून त्यांचेवर आत्तापर्यंत आष्टी आणि अंभोरा पोलीस ठाण्यामध्ये गुन्हे नोंदवण्यात आलेले असून त्यांना एका गुन्ह्यामध्ये शिक्षा सुनावण्यात आलेली आहे अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तीने आमदार सुरेश धस यांच्यासारख्या लोकप्रतिनिधीवर बिनबुडाचे आरोप करून त्यांची बदनामी करू नये भाऊसाहेब लटपटे यांनी त्यांच्या लायकीप्रमाणे वक्तव्य करावीत भाऊसाहेब लटपटे हे वेळोवेळी यूट्यूब चैनल आणि जमेल त्या ठिकाणी आमदार सुरेश धस यांची बदनामी होईल असे वक्तव्य करत आहेत त्यामुळे त्यांचे विरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी भाऊसाहेब लटपटे यांच्या वक्तव्यातून जातीय तेढ निर्माण होण्याची शक्यता असल्यामुळे अशा जातीजातीत भांडण लावणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी अशी विनंती निवेदन करण्यात आली असून भाऊसाहेब लटपटे यांनी जनतेची कोणती कामे केली आहेत हे सांगावे स्वतः गुंड प्रवृत्तीचे असून आमदार सुरेश धस यांच्यासारख्या पाच टर्म आमदार असलेल्या व्यक्तींवर त्यांनी खालच्या पातळीवर जाऊन टीका करावी हे योग्य नाही भाऊसाहेब लटपटे यांनी अगोदर आपला डीएनए तपासला पाहिजे इतक्या खालच्या पातळीवरील टीका करणे हा प्रकार यापुढे खपवून घेतला जाणार नाही भाऊसाहेब लटपटे म्हणजे वंजारी समाज नसून त्यांनीही तसेच समजू नये आष्टी तालुक्यातील वंजारी समाज हा पूर्णपणे आमदार सुरेश धस यांच्या मागे ठाम उभा असून या भागामध्ये केवळ आमदार सुरेश धस यांनी विकास कामे केलेली आहेत त्यामध्ये पाथर्डी सरहद्द ते पाटसरा रस्ता डांबरीकरण कापशी येथील साठवण तलावाची ▶▶ उर्वरित पान २ वर

# आष्टी तालुक्यात येणार पाणलोट रथयात्रा, प्रशासन यंत्रणा सुसज्ज...




### पाणलोट कामांवर श्रमदान अपेक्षित

**सर्व यंत्रणांना एकत्र येऊन गावोगावी पाणलोट चळवळ निर्माण व्हावी, या अनुषंगाने मृद व जलसंधारण कामांचे भूमिपूजन करणे, पाणलोट कामांवर श्रमदान करणे, पाणलोट योद्धे निवडणे इत्यादी कामांचे सूक्ष्म नियोजन करून या उपक्रमांतर्गत शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, बचत गटातील महिला, स्वयंसेवी संस्था व शेतकरी यांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन बीड जिल्हा जलसंधारण अधिकारी संजय आमले यांनी केले आहे.**

आष्टी । प्रतिनिधी

प्रत्येक गावात सामूहिक श्रमदानातून पाणलोट चळवळ निर्माण व्हावी या उद्देशातून केंद्र सरकारने राज्यातील ३० जिल्ह्यात पाणलोट यात्रा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात पाणलोट रथयात्रा शुक्रवार दि २८ मार्च रोजी आष्टी तालुक्यात आगमन होणार असून वाघळुज व लमाण तांडा येथे रथयात्रा येणार असल्याची माहिती पाणलोट समिती वाघळूजच्या अध्यक्षा सुनंदा सुभाष गुंड यांनी दिली. या यात्रेचे उद्घाटन आ. सुरेश धस यांच्या हस्ते होणार असून प्रमुख उपस्थिती म्हणून बीड जिल्हा जलसंधारण अधिकारी संजय आमले,तहसीलदार वैशाली पाटील, गटविकास अधिकारी गोकुळ बागलाणे,माजी आ. साहेबराव दरेकर, सरपंच परिषदेचे अध्यक्ष दत्ता काकडे आदी उपस्थित राहणार आहेत.या यात्रेच्या नियोजनासाठी व स्वागतासाठी प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा तथा उपविभागीय जलसंधारण अधिकारी सतिश पाटील आणि त्यांचे सहकारी परिश्रम घेत आहेत.

# नेकनुरच्या स्त्री रुग्णालयातील अधीक्षकांना प्रसूतीपूर्व आणि प्रसूतीनंतर रुग्णांना दिले जाणारे अंडे व मटकी ही खायला पुराना!

**कंत्राटदार व डॉ. अशोक हुबेकर यांच्याकडे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात लक्ष देणार का?**

रामनाथ घोडके

नेकनूर या ठिकाणी स्त्री रुग्णालयातील वारंवार तक्रारी बाहेर येत असून २२ मार्च रोजी नेकनूरच्या ग्रामपंचायत सरपंच पती व उपसरपंच यांनी नेकनूर रुग्णालयात काही ग्राम पंचायत सदस्य घेत नेकनूर स्त्री रुग्णालयातील आढावा घेत असताना या ठिकाणी गर्भवती महिलांसाठी प्रसूतीपूर्व आणि प्रसूतीनंतर अनेक शासकीय योजना आहेत रुग्णांना विचारपूस केली असता रुग्णांनी सकस आहाराबद्दल सांगितले की आम्हाला ह्या रुग्णालयामध्ये सकस आहारामध्ये अंडी मटकी तसेच इतरही पदार्थ मिळत नाहीत.

नेकनूर चे रुग्णालय वारंवार कुठल्या ना कुठल्या कारणाने चर्चेत असते शासकीय योजनेअंतर्गत प्रसूतीनंतर विविध लाभ दिले जातात. यामध्ये मोफत प्रसूती ▶▶ उर्वरित पान २ वर

# कै. अण्णासाहेब पाटील यांनी माथाडी कामगारांच्या न्याय हक्कासाठी जीवन समर्पित केले तर भगतसिंग, राजगुरु, सुखदेव देशासाठी शहीद झाले: रमेश पोकळे

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील असंघटित कामगारांना त्यांचे न्याय हक्क मिळवून देण्यासाठी कै. अण्णासाहेब पाटील यांनी विविध ठिकाणी विखुरलेल्या कामगारांना एकत्र करून माथाडी कामगार संघटना स्थापन केली. या संघटनेच्या माध्यमातून कामगारांच्या जीवनाला स्थैर्य मिळून देण्यासाठी माथाडी कायदा तयार करून घेतला. माथाडी कामगारांना मदत व्हावी म्हणून अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य या मूलभूत गरजांबरोबरच त्यांच्या मुलांना दर्जेदार शिक्षण मिळवून देण्यासाठी माथाडी भवन, माथाडी पतपेढी निर्माण करून माथाडी कामगारांना त्यांचे न्याय, हक्क मिळवून देण्यासाठी आपले जीवन समर्पित केले. तर शहीद भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांनी भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी शहीद झाले, असे प्रतिपादन संस्था अध्यक्ष रमेश पोकळे यांनी केले आहे. येथील वसंतराव काळे कॉलेज ऑफ जर्नालिझम अँड कम्प्युटर सायन्स बीड व संभाजीराजे कॉलेज ऑफ लायब्ररी ▶▶ उर्वरित पान २ वर



# डॉ. देवरे यांनी बीडमध्ये येऊन आनंदग्रामच्या मुलांना कुटुंबासारखं स्वीकारलं

बीड । प्रतिनिधी

गेल्या काही महिन्यांत बीड जिल्ह्याबद्दल बाहेर फक्त नकारात्मक गोष्टीच बोलल्या जात आहेत. लोकांना वाटतं, इथे गुन्हेगारीशिवाय काहीच घडत नाही. पण अशा गडद छायेतही काही प्रकाशकिरण असतात, आणि डॉ. विजय देवरे आणि सौ. सोनल देवरे हे त्यापैकीच एक.

मुंबईतल्या या डॉक्टर दाम्पत्याने त्यांचा विवाह आनंदग्राममध्ये साजरा करण्याचा निर्णय घेतला. पंचतारांकित हॉटेल किंवा आलिशान सोहळ्याऐवजी त्यांनी समाजाने दूर केलेल्या क्षत/खऊडबाधित मुलांसोबत हा मंगल क्षण साजरा करायचं ठरवलं. ज्या मुलांना कधीच कुणी लग्नाला बोलवत नाही, त्यांच्या साक्षीने



विवाहबद्ध होणं – हा विचारच माणुसकी ची खरी व्याख्या. त्यांनी केवळ जिल्ह्यालाच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राला एक सकारात्मक संदेश दिला. हा विवाह सामान्य नव्हता, तो एक आदर्श विवाह सोहळा होता. वृक्षारोपण, ग्रंथदिंडी, विधवा महिलांच्या हस्ते औक्षण, संविधान प्रस्ताविकेचे वाचन आणि राष्ट्रगीताने सांगता – हा सोहळा म्हणजे केवळ विधी नव्हते, तर समाजाला दिलेला एक संदेश होता. आनंदग्रामच्या चिमुकल्यांनीही मनसोक्त आनंद लुटला – मेहंदी, हळद, डान्स, खेळ, ▶▶ उर्वरित पान २ वर

# २३ मार्च चा जीआर रद्द करण्यासाठी आर्थिक मदत करा- शिवाजी कवठेकर

बीड । प्रतिनिधी

काँग्रेसच्या शरद पवार सरकारने २३ मार्च १९९४ रोजी जीआर काढून मंडल आयोगाच्या नावाखाली ओबीसींना बेकायदेशीर पद्धतीने १६ टक्के आरक्षण वाढवून दिले. हे १६ टक्के आरक्षण घटनाबाह्य असल्यामुळे ते रद्द करण्यात यावे!,अशी मागणी करणारी जनहित याचिका शिवाजी कवठेकर, विनोद इंगोले, नारायणराव थोरात, गोविंद सवासे व शेख युसूफ या पाच जणांच्यामार्फत आरक्षण बचाव आंदोलन समितीच्यावतीने

लोकवर्गणीतून मुंबई उच्च न्यायालयात जुलै २०२२




मध्ये दाखल करण्यात आली होती.सदरील याचिकेच्या सुनावणीकरता आरक्षण बचाव आंदोलन समितीने पाच लाख रुपये सुरक्षा अनामत रक्कम म्हणून न्यायालयात जमा केलेले आहेत.सदरील याचिका सध्या सुनावणीसाठी मा उच्च न्यायालयासमोर आहे.तथापि,या याचिकेसाठी पैशांची गरज आहे म्हणून लोकांनी आर्थिक मदत करावी, असे आवाहन सर्व याचिकाकर्त्यांच्या वतीने प्रसिद्ध केलेल्या पत्रकातून करण्यात आलेले आहे. पत्रकात म्हटले आहे की, सदरील याचीकेसाठी आर्थिक मदत करावी असे आवाहन आरक्षण बचाव आंदोलन समितीच्या वतीने जानेवारी २०२२ मध्ये केले होते. त्यावेळी लोकांनी केलेली मदत जवळपास चार लाख रुपये होती.या चार लाख रुपयांच्याआधारेच आरक्षण बचाव आंदोलन समितीने जुलै २०२२ मध्ये याचिका दाखल केली. पण त्यावर्षीच झालेल्या नोव्हेंबरच्या सुनावणीमध्ये न्यायालयाने प्रत्येक याचिकाकर्त्यासाठी एक लाख रुपये असे एकूण पाच लाख रुपये डिपॉझिट म्हणून जमा करा नसता याचिका सुनावणीला घेणार नाही असे सांगितले. त्यावेळी पैसे परत करण्याच्या हमीवर काही लोकांनी तीन लाख रुपयांची मदत केली; तर दोन लाख रुपये खाजगी ▶▶ उर्वरित पान २ वर




# पवनचक्की कंपन्यांनी शेतकऱ्यांना मावेजापोटी दिलेले धनादेश वठलेच नाहीत; बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथील प्रकार

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील मळुकवाडी येथील रिन्यु ग्रीन पवनचक्की कंपनीने शेतकऱ्यांना मावेजा पोटी दिलेले धनादेश वठले नसल्याने व विचारणा केल्यानंतर आधिकारी उडवाउडवीची उत्तरे देत टाळाटाळ करत असल्याने शेतकऱ्यांनी तिव्र नाराजी व्यक्त केली आहे.बीड तालुक्यातील बालाघाटावरील पवनचक्की कंपन्यांचा मनमानी कारभार सुरूच असुन जिल्हा प्रशासन



आणि पोलीस प्रशासनाची भूमिका शेतकऱ्यांना न्याय भुमिकेतुन संरक्षण देण्याऐवजी पवनचक्की कंपन्यांची पाठराखण करण्याची असुन कुंपनच शेत खात असेल तर दाद कोणाकडे मागायची अशी संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली आहे.

बीड तालुक्यातील मळुकवाडी येथील शेतजमिनीत रिन्यु ग्रीन एम.एच.पी.वन. प्रायव्हेट लिमिटेड नवी दिल्ली या कंपनीने पवनचक्की उभारली आहे. पवनचक्कीची उभारणी करताना काही क्षेत्र पवनचक्की भागात आणि काही क्षेत्र रस्ता शेतातुन गेल्याने पवनचक्की कंपन्यांच्या आधिका-यांनी पंजाब नॅशनल बँकेचे धनादेश खाते क्रमांक ७८३५००२१००००२८६४ वरून शेतकरी अंबादास रामकिसन ढास यांना १,४९,८१३ रूपये चेक नंबर ५२३५२८ , शेतकरी सुभाष रामकिसन ढास यांना १,३८,०६३ चेक नंबर ५२३५२९ आणि शेतकरी शेषेराव रामकिसन ढास यांना १,३८,०६२ रूपये चेक नंबर ५२३५३० अशी एकुण रक्कम ४,२५,९३८ रुपये किंमतीचे धनादेश वठलेच नाहीत. संबंधित प्रकरणात पवनचक्की कंपन्यांच्या आधिका-यांना विचारणा केली असता अगोदर उडवाउडवीची उत्तरे दिली असुन आता फोन घेण्यास सुद्धा टाळाटाळ करत असल्याची तक्रार अंबादास ढास यांनी केली आहे.

उभ्या ज्वारीच्या पिकातुन गाड्या घातल्या कडब्याचे नुकसान झाले त्याचीही भरपाई अद्याप दिलीच नाही – संदिप ढास : महिनाभरापूर्वी आमच्या शेतातील ज्वारीच्या उभ्या पिकातुन सहमतीशिवाय पवनचक्की प्रकल्प उभारण्यासाठी पोकलेन, जेसीबी,पिक अप अशा विविध वाहनांची वाहतूक केली. तेव्हा तुम्हाला नुकसान भरपाई देण्यात येईल असे सांगितले. परंतु पवनचक्की प्रकल्प उभारल्यानंतर अद्याप नुकसान भरपाई दिलीच नाही.जवळपास ८०० कडबा आणि ज्वारीची कणसे धुळीमुळे खराब झाली आहेत. अगोदर दिवसातुन ४-५ वेळा मनधरणी करण्यासाठी येणारे अधिकारी आता फोन सुद्धा उचलत नाहीत.या प्रकरणी ऊद्या सोमवारी जिल्हाधिकारी बीड व पोलीस अधीक्षक बीड यांना लेखी तक्रार करणार असल्याचे संदिप ढास यांनी सांगितले.

▶▶ उर्वरित पान २ वर